International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 42 November - December - 2025

# विशेषत: अतिमागास आदिवासी समुहातील (PVTGs) 'कातकरी' या जमातीचे भीषण निरपेक्ष दारिद्र्य एक वास्तव – विशेष अभ्यास – पनवेल तालुका

**श्री. हरिभाऊ सामा खरात[1], प्रा. डॉ. बाळासाहेब साहेबराव पाटील[2]**
*[1]संशोधक विद्यार्थी,*
*[1]चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, नविन पनवेल (स्वायत्त), रायगड*
*[2]संशोधन मार्गदर्शक,अर्थशास्त्र विभागप्रमुख,*
*चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, नविन पनवेल (स्वायत्त), रायगड*
*Corresponding Author – श्री. हरिभाऊ सामा खरात*
**DOI - 10.5281/zenodo.17906025**

**सारांश:**

*आदिवासी समाज हा अतिप्राचीन मूळ भारतीय समाज आहे. एकेकाळी भारतीय वनसंपत्तीचा मालक असणारा हा समाज. आदिवासी म्हणजे आदिकाळापासून वास्तव्य असणारा समुह होय. आदिवासी समाज हा निसर्गपूजक आहे. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्यांना प्राणीपूजक, प्राचीन अगदी मूळ रहिवासी म्हणून संबोधलं. भारताच्या राज्यघटनेत कलम ३४२ मध्ये 'आदिवासी' या शब्दाला अनुसूचित जमाती हा शब्द वापरण्यात आला. 'कातकरी जमात' ही महाराष्ट्रातील सहयाद्रीच्या दऱ्याखोऱ्यात राहणारी एक वन्य जमात आहे. महाराष्ट्र राज्याचा विचार करता महाराष्ट्रात एकूण ४७ अनुसूचित जमाती आहेत. त्यापैकी कातकरी (मुख्यत: रायगड व ठाणे), कोलाम (यवतमाळ), माडीया गोंड (गडचिरोली) महाराष्ट्रातील या तीन जमातींचा केंद्र शासनाने 'आदिम जमाती' अर्थात विशेषत: अतिमागास आदिवासी समुहातील जमाती म्हणून त्यांचा समावेश केला.*

*आधुनिक पनवेलचा विचार करता एक प्रकारे विकासाचे हब म्हणून पनवेलचा विचार करण्यात येतो. पनवेल हा औद्योगिकदृष्ट्या प्रगत तालुका आहे. सद्य स्थितीत पनवेल महानगरपालिका, सिडको, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जे.एन.पी.टी, नैना यासारखे असंख्य प्रकल्प पनवेल तालुक्यात प्रगती पथावर आहेत. पण मात्र कातकरी ही आदिम जमात दऱ्याखोऱ्यांत राहणारी एक वन्य जमात. खरं तर ही अरण्यवासी जमात. कातकरी बांधव आजही मुख्य गावापासून दूर डोंगराळ व उंचपठारांच्या प्रदेशात वसाहत करून राहतात. पनवेल तालुक्याच्या विकासाचा विचार करता कातकरी बांधव विकासापासून वंचित असल्याचे दिसून येते. आजही कातकरी बांधव आर्थिकदृष्ट्या मागासलेले बेरोजगार दिसून येतात. आजही हे बांधव आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत.*

***बिजसंज्ञा: आदिम,कातकरी,निरपेक्ष दारिद्र्य, वेठबिगारी, स्थलांतर.***

**प्रस्तावना :**

विकसनशील भारताची विज्ञान, तंत्रज्ञान आणि अंतराळ क्षेत्रातील दैदीप्यमान प्रगती एकविसाव्या शतकात विकसित राष्ट्रांकडे घेऊन जात असताना, त्या रथात आरुढ झालेल्या भारतीय समाजातील प्रत्येक घटक केवळ साक्षर होणे इतकेच अपेक्षित नसून त्याने सुशिक्षित नागरिक होणे गरजेचे आहे. उदरनिर्वाहाची साधने प्राप्त झाल्यानंतर मानवाने खेड्यात व

सुधारलेल्या लोकवस्तीत राहणे पसंत केले. परंतु काही भूमीपुत्रांनी या सर्व लोकवस्तीपासून दूर व दुर्गम भागात असलेल्या डोंगरकपारीत आपला तळ ठोकला. आपल्याच रूढी व परंपरांना पालीसारख्या चिटकून राहणाऱ्या, फळाफुलांच्या, झाडपाल्याच्या चवीने समाधान पावणाऱ्या आदिवासी / जनजाती / वनवासी जमातीचे जीवन स्वछंदी पाखरासारखे असते. या समाजाला जंगलचे राजे, धरतीची लेकरे, आदिम जमाती, आदिवासी समाज, वनवासी बांधव, जनजाती बांधव असा उल्लेख केला जातो. आजही आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे पूर्ण झाली, तरीही अनेक सुख सुविधांपासून वंचित असा हा समाज. दारिद्रय, अज्ञान, अंधश्रद्धा व जुलूम यांच्या अंधारात भटकत डोंगरकपारीत खडतर जीवन जगत आहे. अशा या समाजाच्या वाटचालींचे ऐतिहासिक महत्व, पार्श्वभूमी, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय परिस्थिती समजून घेणे आवश्यक आहे. त्याच अनुषंगाने मी पनवेल तालुक्यातील या आदिम जमातीचा आर्थिक स्थितीमधील निरपेक्ष दारिद्र्याचा अभ्यास करीत आहेत.

कातकरी जमातीच्या उत्पत्तीविषयी विविध तज्ञांनी अनेक विचार मांडले. आदिवासीमध्ये 'कातकरी' हा ठाण्याचा आद्य मानव मानला जात असे. या जमातीची वस्ती अनादी काळापासून आहे. इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांच्या मते, काथोडी इ.स. पूर्व ५००० ते ६००० वर्ष सहयाद्रीच्या दऱ्याखोऱ्यात राहत असावेत. कृती म्हणजे कातडे व पट्टीन म्हणजे ते वापरणारा यावरून 'कृतीपटटीन' या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश होऊन कातवडी नाव पडले असावे. आपली उत्पत्ती रामाच्या वानरसेनेपासून झाली असे कातकरी बांधव सांगतात. तर खैराच्या झाडापासून काथ तयार करण्याच्या त्यांच्या धंद्यावरून त्यांना 'कातकरी' नाव पडले असे तज्ञ म्हणतात. या जमातीला कातकरी, काथवडी, काथोडी या विविध नावांनी संबोधले जाते. कातकऱ्यांच्या एकूण ९३ कुळी आढळतात. कुळी म्हणजे त्यांची आडनावेच आहेत. गावापासून दूर नदीकाठी किंवा डोंगर कपारीत त्यांची वसाहत असते. तिला कातवाडी असे म्हणतात. त्यांची स्वत:ची अशी जमीन जवळजवळ नाहीच आणि नियमित अर्थार्जन होईल असा धंदाही नाही. शिकार करणे, कोळसा पाडणे, रानातील कंदमुळे व वाळलेली लाकडे गोळा करून खेडोपाडी विकणे, गोड्या पाण्यात मच्छीमारी करणे, शेतावर मोलमजुरी करणे व वरकस जमीन कसणे, शेळ्यांचे पालन करणे हे यांचे व्यवसाय आहेत.

**उद्दिष्ट्ये :**

१. 'कातकरी' जमातीतील निरपेक्ष दारिद्र्याचा अभ्यास करणे.

**गृहीतकृत्य :**

(H0) 'कातकरी' या आदिम जमातीच्या निरपेक्ष दारिद्र्याचा स्थलांतराशी सबंध नाही.

(H1) 'कातकरी' या आदिम जमातीच्या निरपेक्ष दारिद्र्याचा स्थलांतराशी सबंध आहे.

**संकल्पनांची मांडणी :**

१. आदिम - ज्या जमाती अजूनही सांस्कृतिकीकरणाच्या प्रक्रियेत कनिष्ठ स्तराला आहेत अथवा ज्यांच्या मूळ स्थितीत अजून तुलनात्मकदृष्ट्या फारसा फरक झाला नाही "

२. कातकरी – 'अनुसूचित जमातीतील एक जात. आज काथोडी, काथवडी, ढोर कातकरी, सोन कातकरी, कातकरी या विविध नावांनी ओळखली जाते.

३. निरपेक्ष दारिद्र्य – मुलभूत गरजांच्या पूर्ततेचा अभाव. उदा. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य.

४. वेठबिगारी –व्यक्तीच्या अज्ञानाचा, दुर्बलतेचा आणि दुबळेपणाचा गैरफायदा घेऊन तिला योग्य मोबदला न देता सक्तीने काम करण्यास भाग पाडणे.

५. स्थलांतर –"एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी केलेली हालचाल म्हणजे स्थलांतर"

**अभ्यास क्षेत्र :**

आज रायगड जिल्हयातील कातकरी जमातीची लोकसंख्या १,१९,५७३ इतकी असल्याचे २०११ च्या जनगणनेनुसार दिसून येते. यामधील जवळपास ३० ते ३५ टक्के लोकसंख्या ही पनवेल तालुक्यात वास्तव्य करीत असल्याचे दिसून आले. मोर्बे, वाकडी, रिटघरवाडी, शिवणसई, आखाडावाडी, वहाळची वाडी, चिंचवणवाडी, मुखरीचीवाडी, वलप, चिंचवण या १० वाड्यांची सर्वेक्षणासाठी निवड केलेली आहे.

**संशोधन पद्धती:**

मी स्वत: पनवेल तालुक्यातील १० गावांना / वाड्यांना प्रत्यक्ष भेट देऊन निरीक्षण, अनुसूची आणि मुलाखतीच्या साह्याने अर्थात प्राथमिक स्रोतांच्या आधारे माहिती संकलित करण्याचा प्रयन केलेल्या आहे.

**नमुन्याचा आकार :**

पनवेल तालुक्यात ५६४ गावांपैकी जवळपास १४६ गावांमध्ये किंवा वाड्यांमध्ये  कातकरी कुटुंब वास्तव्य करीत असल्याचे निदर्शनास येते आहेत. संशोधनात्मक अभ्यास कार्यासाठी पनवेल तालुक्यातील निवडक १० वाड्यांचा अभ्यास प्राथमिक सर्वेक्षणाद्वारे करण्यात आला. या १० वाड्यांमधील साधारणत: १० कुटुंबाची अनुसुचीच्या आधारे सर्वेक्षण करण्यात आले. प्रत्येक वाडीवरील साधारणपणे १० कुटुंबाना भेटी देऊन माहिती संकलित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. साधारणत: ९३ कुटुंबाची माहिती संशोधन कार्यासाठी विचारात घेतलेली आहे. थोडक्यात ६.८४ टक्के वाड्यांची निवड गैर संभाव्यता नमुना निवड पद्धतीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीच्या आधारे निवड करण्यात आली.

**उत्पन्नाचे मुख्य स्रोत खालीलप्रमाणे:**

**नोकरी :**

आज देशात कृषी,उद्योग क्षेत्रातील उत्पन्नापेक्षा सेवा क्षेत्रातील उत्पन्न हे मोठ्या प्रमाणावर प्राप्त होत आहे. मात्र पनवेल तालुक्यातील कातकरी बांधवांची स्थिती सेवा क्षेत्रात अत्यंत हलाखीची असल्याचे संशोधनाच्या अभ्यासातून प्रत्ययास आले. सेवा क्षेत्रातील नोकरदार वर्गाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात येते.

**शासकीय नोकरी :**

कातकरी जमातीची केंद्र शासनाने अत्यंत आदिम जमात म्हणजे गरीबातील गरीब जमात म्हणून घोषणा केली. आजही या जमातीची आर्थिक स्थिती अत्यंत दयनीय असल्याचे प्रत्ययास आले.संशोधन अध्ययनातून असे निदर्शनास आले की,९३ कुटुंबांपैकी फक्त ४ कुटुंबातील ४ व्यक्ती या सरकारी क्षेत्रात अर्थात सेवा क्षेत्रात कार्यरत असल्याचे दिसून आले .यामध्ये १ प्राथमिक शिक्षक, १ वनपाल,१ आकाशवाणी केंद्र सहाय्यक आणि १ शालेय चतुर्थ श्रेणी कर्मचारी असे वर्गीकरण करण्यात आले.म्हणजे हे प्रमाण ४.३०%इतके अगदी नगण्य असल्याचे दिसून

आले.प्रामुख्याने कातकरी या आदिम जमातीचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये असून देखील ही जमात शासकीय नोकऱ्यांपासून वंचित असल्याचे दिसून आले.

**खाजगी नोकरी :**

१० पाड्यांमधील अनुसूचीच्या साह्याने अध्ययन केल्यानंतर विविध कंपन्या ,उद्योग ,कारखाना , तळोजा एम.आय.डी.सी, खाजगी बँका ,किराणा दुकान कर्मचारी आणि खाजगी दवाखाने यामध्ये साधारणपणे १८ इतकी संख्या कार्यरत असल्याचे दिसून आले.

**शेती :**

भारतात पंचवार्षिक योजनांचे युग सुरू होण्यापूर्वी देशातील शेती व्यवसाय अत्यंत मागासलेल्या स्थितीत होता.पण तरीही शेती हाच भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा होता आणि आहे. म्हणूनच भारताच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून शेती क्षेत्राला प्राधान्य देऊन अधिकाधिक खर्च शेती व शेतीशी सबंधित घटकांवर केला जातो.शेती क्षेत्राची वाढ ही अन्नसुरक्षा, ग्रामीण रोजगार आणि ग्रामीण जनतेचे राहणीमान उंचावण्यासाठी महत्वाचे आहे. म्हणूनच खेडे गावांमध्ये आज शेतीला महत्वाचे स्थान आहे.ग्रामीण भागात अद्यापही शेती हा मुख्य व्यवसाय असून अन्य व्यवसाय हे दुय्यम स्वरूपाचे आहेत. पूर्वीच्या काळी ‘उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी’ असं सूत्र होतं. १० पाड्यांमधून स्वत:च्या मालकीचे जमीनीवर शेती करणारे, दुसऱ्यांच्या शेतीवर अर्ध्या हिस्साने शेती केली जाते. ९३ कुटुंबापैकी फक्त १६ कुटुंब ही स्वत:च्या किंवा दुसऱ्यांच्या शेतावर शेती प्रामुख्याने भातशेती करत असल्याचे दिसून आले.

**मजुरी :**

कातकरी बांधव विशेषत:मोलमजुरीच्या माध्यमातून स्वत:चा उदरनिर्वाह करीत असल्याचे दिसून आले.यामध्ये प्रामुख्याने हमाल धक्यांवर मजुरीसाठी जाणे ,आजूबाजूच्या पाड्यांवर, गावांमध्ये मजूर म्हणून काम करणे, पेंटिंगसाठी बाहेर मजूर म्हणून जाणे,बांधकामक्षेत्रात गवंडी यांच्या हाताखाली मजूर म्हणून जाणे,फार्महाऊसवर इत्यादी क्षेत्रात हे बांधव मजुरी करतात. अध्ययन केलेल्या कुटुंबापैकी ५३ मजुर मजुरीसाठी कार्यरत असल्याचे दिसून आले.उत्पन्नाच्या स्रोतांपैकी सर्वाधिक मोलमजुरीचे प्रमाण दिसून आले.


**व्यवसाय / धंदा (किराणा):**

कातकरी या जमातीमधील बांधवांचे व्यवसाय किंवा धंदा यामध्ये अत्यल्प प्रमाण असल्याचे प्रत्ययास आले.साधारणत: फक्त २ कुटुंबाकडे छोट्या प्रकारची किराणा दुकाने होती. त्यामधून प्राप्त होणारे उत्पन्न देखील तूटपुंज्य मिळत असल्याचे दुकान धारकांनी कबूल केले.

| उत्पन्नाचे स्रोत | कुटुंबांची संख्या |
|---|---|
| सरकारी नोकरी | ०४ (४.३०%) |
| खाजगी नोकरी | १८ (१९.३५%) |
| शेती | १६ (१७.२०%) |
| मजुरी | ५३ (५६.९९%) |
| व्यवसाय / धंदा (किराणा) | २ (२.१६%) |
| एकूण | ९३ ( १००%) |

स्रोत :- सर्वेक्षण आधारे संकलन

**उत्पन्नाच्या स्रोतांची वर्गवारी :**





वरील आकृत्तीमध्ये प्रामुख्याने सूचित करण्यात येते की,उत्पन्नाचे स्रोत दर्शविलेले आहेत. यामध्ये कातकरी बांधवांना सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण असून देखील शासकीय किंवा खाजगी नोकऱ्यांत अत्यल्प प्रमाण दिसून येते.तर मजुरी हाच उत्पन्नाचा प्रमुख स्रोत असल्याचे दिसून आले.

**कुटुंबनिहाय वार्षिक उत्पन्नाची वर्गवारी:**

| वार्षिक उत्पन्न (रुपये) | कुटुंबसंख्या |
|---|---|
| रु .१०००० पेक्षा कमी | ०८ |
| १०००० – २०००० रुपये | १५ |
| २०००० – ३०००० रुपये | २१ |
| ३०००० – ४०००० रुपये | ११ |
| ४०००० – ५०००० | १० |
| रु .५०००० पेक्षा जास्त | २८ |
| एकूण | ९३ |

स्रोत :- सर्वेक्षण आधारे संकलन



वरील स्तंभालेखामध्ये ९३ कुटुंबाची वार्षिक उत्पन्नाची वर्गवारी दर्शविलेली आहे. यामध्ये प्रामुख्याने कातकरी बांधवांचे उत्पन्न हे प्रामुख्याने अत्यल्प असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांच्या मुलभूत गरजांची पूर्तता देखील व्यवस्थितपणे होत नसल्याचे दिसून आले.

**उत्पन्नाचे दुय्यम स्रोत खालीलप्रमाणे :**

कातकरी समुदाय प्रामुख्याने शेती,मोलमजुरी,नोकरी,व्यवसाय/धंदा या उत्पन्नाच्या स्रोतांबरोबर खालील स्रोत देखील त्यांच्या उत्पन्नात अल्पशा:प्रमाणात सहाय्यक ठरतात.ते खालीलप्रमाणे.

अ. वीटभट्टी :-

पनवेल तालुक्यातील खूप मोठ्या प्रमाणात कातकरी बांधव स्थलांतराच्या माध्यमातून वीटभट्टीवर कार्यरत असतात .कर्त्या लोकसंख्येच्या प्रमाणात साधारणपणे २३ कुटुंबे (२४.७३%) ही वीटभट्टीवर कार्यरत असल्याचे दिसून आले. दिपावली नंतर साधारणत: नोव्हेंबर ते जून या महिन्यात वीटभट्टी हा व्यवसाय केला जातो. या उर्वरित काळात वीटभट्टी या व्यवसायापासून कातकरी समुदायास रोजगार प्राप्त झाला .

**ब. वनभाज्या (रानभाज्या) विक्री :**

कातकरी समुदायाचे प्रामुख्याने जंगलांशी घनिष्ठ सबंध असतात.त्यामुळेच त्यांना जंगलचे राजे म्हणतात. आपल्या जीवनातील बराचसा कालावधी जंगलामध्ये राहून व्यतीत करतात. बहुतांश कुटुंबातील सदस्य महिला या जून ते सप्टेंबर या कालावधीत विविध वनभाज्या जंगलातून गोळा करून गावाच्या मुख्य ठिकाणी, शहराच्या ठिकाणी जाऊन वनभाज्यांची विक्री करून तुटपुंज्य प्रमाणात उत्पन्न प्राप्त होते. ६ महिलांना वन भाज्यांच्या माध्यमातून उत्पन्न प्राप्त होते.

**क. मत्स्य / खेकडे विक्री :**

कातकरी समुदायाच्या आहारात मांसाहाराचा समावेश प्रामुख्याने होतो. त्यानुसार हे बांधव पावसाळ्यात खेकडे, मुठे, मासे पकडून त्यांची गावामध्ये किंवा शहराच्या ठिकाणी जाऊन विक्री करतात. तसेच छोट्या,मोठ्या नद्यांमधून उन्हाळ्यात पाण्याचा उपसा करून मासे पकडून त्यांची विक्री करतात. तसेच हे बांधव स्वत:च्या आहारात देखील अधिकाधिक प्रमाणात वापर करतात. संशोधनाच्या माध्यमातून ७ व्यक्तींना मत्स्य विक्रीतून अल्प प्रमाणात उत्पन्न उपलब्ध होते. जेणेकरून ते उत्पन्न दैनंदिन गरजांसाठी सहाय्यभूत ठरते.

**ड. मळा (भाजीपाला उत्पादन) :**


कातकरी समुदायातील बहुतांश कुटुंबे ही नद्यांच्या, धरणांच्या किनाऱ्यावर वसलेली दिसून येतात. त्यामुळे पाण्याची उपलब्धतता विचारात घेऊन प्रामुख्याने भाजीपाल्याचे उत्पादन केले. यामध्ये काकडी, शिराळी, भेंडी, गवार, दुधी इत्यादी भाजीपाल्याचे उत्पादन करून त्याची आजूबाजूच्या गावांमध्ये विक्री केली जाते. किंबहुना पनवेल भाजी मार्केटमध्ये देखील विक्री केली जाते. भाजीपाल्याचे उत्पादन करणारी ९ कुटुंब असल्याचे अभ्यासाअंती दिसून आले.

**उत्पन्नाच्या दुय्यम स्रोतांमधील उत्पन्नाचे प्रमाण :**

| उत्पन्नाचे दुय्यम स्रोत | कुटुंबसंख्या |
|---|---|
| वीटभट्टी | २३ ( २४.७३%) |
| वनभाज्या (रानभाज्या) | ६ (६.४५%) |
| मत्स्य विक्री | ७ (७.५३%) |
| मळा | ९ (९.६८%) |
| एकूण | ४५ (४८.३९%) |

स्रोत :- सर्वेक्षण आधारे संकलन

वरील तक्त्यांमध्ये कातकरी बांधव हे प्रामुख्याने मजुरीबरोबरच काही ना काही प्रमाणात दुय्यम उत्पन्न थोड्याफार प्रमाणात मिळवीत असल्याचे दिसून आले. दुय्यम उत्पन्न मिळविणाऱ्यांचे प्रमाण ४८.३९% असल्याचे अभ्यासातून दिसून आले.




**स्थलांतर हेच रोजगार निर्मितेचे :**

कातकरी बांधवांमध्ये स्थलांतराची प्रक्रिया खूप मोठ्या प्रमाणावर दिसून येते. अभ्यासाअंती जवळजवळ २९ कुटुंबे ही वर्षभराच्या कालावधीत साधारणत: ५ ते ६ महिन्यांच्या कालावधीसाठी आपली वाडी सोडून रोजगारासाठी जातात. यामधील २३ कुटुंबे ही वीटभट्टीवर रोजगार प्राप्तीसाठी स्थलांतर करतात. तर ६ कुटुंबे ही बांधकाम क्षेत्रात रोजगार प्राप्तीसाठी स्थलांतर करतात. हे स्थलांतर सर्वेक्षण केलेल्या कुटुंबांच्या ३१.१८% असल्याचे दिसून येते. थोडक्यात ही जमात रोजगार प्राप्तीसाठी अधिकाधिक प्रमाणात स्थलांतर करते.

**निष्कर्ष :**

कातकरी या आदिम जमातीतील ९३ कुटुंबांना प्रत्यक्ष भेट दिल्यानंतर पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढता येतील.

१. कातकरी या जमातीची आर्थिक परिस्थिती दयनीय असल्याचे अभ्यासातून दिसून आले . फक्त २८ कुटुंबांचे (३०.१०%) उत्पन्न ५०००० रुपयापेक्षा अधिक असल्याचे दिसून येते. उर्वरित कुटुंबे ही तुटपुंज्य उत्पन्नावर आपला उदरनिर्वाह चालवितात.थोडक्यात ही आदिम जमात भीषण निरपेक्ष दारिद्र्याशी सामना करीत असल्याचे प्रत्ययास आले.

२. कातकरी या आदिम जमातीमध्ये रोजगारासाठी मोठ्या प्रमाणावर कुटुंबासह स्थलांतर घडून येते.

३. या जमातीचे रोजगार निर्मितीसाठी होणाऱ्या स्थलांतराच्या प्रक्रियेतून प्रामुख्याने वेठबिगारीची समस्या निर्माण होत असल्याचे दिसून आले .

**शिफारशी:**

कातकरी या आदिम जमातीच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करताना खालीलप्रमाणे शिफारशी कराव्यात असे सुचले.त्या खालीलप्रमाणे.

१. शासनाने प्रामुख्याने कातकरी या आदिम जमातीच्या नागरिकांसाठी खूप मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून घेता येईल यादृष्टीने योजनांची अंमलबजावणी करावी.

२. स्वयंरोजगाराच्या उद्देशाने प्रत्येक पाड्यावर नागरिकांना लघु व्यवसाय या उद्देशाने आवश्यक ते मार्गदर्शन करणे.

३. वेठबिगारीची समस्या निर्माण होणार नाही. यादृष्टीने शासनाने कायद्याची कडक अंमलबजावणी करावी.

**उपाययोजना :**

१. कातकरी ही जमात प्रामुख्याने रोजगार निर्मितीसाठी स्थलांतर करते. त्यामुळे या बांधवांना त्यांच्या गावातच रोजगार उपलब्ध करून देता येईल. यादृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक आहे .

२. प्रत्येक वाडी वस्त्यांवर छोट्या रोजगार निर्मितीचे केंद्र स्थापन करण्यात यावे. तसेच दुय्यम उद्योग उभारणीसाठी नागरिकांचा प्रेरित करणे.

**सारांश :**

कातकरी ही आदिम जमात आजही तुटपुंज्य उत्पन्नावर आपला उदरनिर्वाह चालवीत असल्याचे संशोधनातून दिसून आले .खूप मोठ्या प्रमाणावर ही जमात आपली भटकंती करून उदरनिर्वाह चालवीत असल्याचे प्रत्ययास आले. पोटाची भूक भागवण्यासाठी रोजगाराच्या शोधात या आदिवासी कातकरी जमातीचे लोक वर्षानुवर्षे स्थलांतर, भटकंती यामुळे ते अर्धे-भटके, दारिद्रय, शोषित मजूर म्हणून जगत आहेत. या आदिम जमातीला मिळणाऱ्या तुटपुंज्य उत्पन्नातून दैनंदिन गरजांच्या पूर्ततेसाठी सामना करावा लागत असल्याचे दिसून आले. थोडक्यात या जमातीमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर भीषण निरपेक्ष दारिद्रय असल्याचे दिसून आले.

**संदर्भसुची :**


1. महाराष्ट्रातील आदिवासी डॉ. शौनक कुलकर्णी – डायमंड पब्लिकेशन्स – प्रथम आवृत्ती – २००९.
2. आदिवासी संस्कृत्ती - प्रा.डॉ. पुष्पा यशवंत गावित – अथर्व पब्लिकेशन्स – प्रथमावृत्ती – १७ ऑक्टोबर, २०१४.
3. विश्व वनवासींचे – डॉ.भास्कर गिरधारी – भारतीय विचार साधना, पुणे – प्रथमावृत्ती – १ जानेवारी, २०१८.
4. मी कातकरी – श्री. कृष्णा कातकरी – विष्णू महादेव कुलकर्णी प्रकाशन - डिसेंबर – २०१९.
5. कातकरी विकास की विस्थापन – मिलिंद बोकील - मौज प्रकाशन गृह

6. हुतात्मा नाग्या कातकरी – श्री. वसंत भाऊ पाटील – वनयात्री प्रकाशन -एप्रिल – १९९९.
7. Census Report - 2011
8. Research Methodology – C.R.Kothari and Gaurav Garv – New Age International Publishers – Fourth Multi Colour Edition – 2019
9. Rohit Mutatkar - Poverty & Deprivation among the katkari Vol.52, IssueNo.13, 1 April, 2017
10. Save the Katkari - Indigenous Forest Tribe of Maharashtra, India - Erik Adamserik_adams@start.com.au
11. Kulkarni & Deshpande : Folk therapies of katkaris from Maharashtra – Indian Journal of Traditional Knowledge – Vol. 10 ( 3 ), July 2011 Page No. 554-558.
12. Government of India. (2011). Census of India 2011: Primary Census Abstract for Scheduled Tribes – Maharashtra. Office of the Registrar General & Census Commissioner, India.
13. Ministry of Tribal Affairs. (2013). Report on the Status of Particularly Vulnerable Tribal Groups (PVTGs) in India. Government of Ind
14. Baviskar, A. (2019). Tribes and Development in Contemporary India. Economic and Political Weekly, 54(36), 45–52.
15. Deshmukh, P. S., & Pawar, R. K. (2021). Socio-economic conditions of Katkari tribe in Maharashtra: A case study of Raigad district. Journal of Tribal Research and Development Studies, 15(2), 112–128.
16. Kothari, A., & Pathak, N. (2017). Development and Displacement among Tribal Communities in Western India. Social Change and Development, 14(1), 25–39.
17. Joshi, S. (2020). Absolute Poverty and Deprivation among PVTGs in Raigad District of Maharashtra. Indian Journal of Regional Development Studies, 8(3), 64–78.
18. Katdare, P., & Wagh, A. (2022). Impact of Urbanization on Katkari Tribal Settlements in Panvel Tahsil. Journal of Social Inclusion and Development, 10(1), 58–71.
19. Xaxa, V. (2014). State, Society, and Tribes: Issues in Post-Colonial India. Pearson.
20. Singh, K. S. (1993). The Scheduled Tribes. Oxford University Press.